# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक ०१.१२.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. ३०/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३१६ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,३२,३३०/- रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.३०/११/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०९ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ७६.०५ लिटर दारू असा एकुण २५,६४०/-रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**ई सी ॲक्ट सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. ३०/११/२०२२ रोजी फिर्यादी छगन सुदामा गायकवाड वय ४० व्य.नौकरी पोना/८४७ ने पोस्टे गोरेगाव यांचे फिर्यादी वरून पोस्टे गोरेगाव येथे ३२८,२७२,२७३,१८८ भादवी व सहकलम 26(2)(i),26(2)(iv),27(2)(e),30(2)(अ)59 अन्न सुरक्षा व मानके कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील आरोपीने महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला वेगवेगळया कंपनीचा सुगंधीत गुटखा हा मानवी स्वास्थास अपायकारक विषारी घटक आहे हे माहीत असतांना सुध्दा स्वताचे फायदयासाठी स्वताचे घरी विक्री करण्याकरीता गुटख्याचा माल आम्हा पोलीसांना पाहुन जागीच सोडुन पळुन गेला गुन्हा दाखल असुन आरोपीकडुन एकुन ६१,०८९ रू चा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे व पुढील तपास गोरेगाव पोलीस करित आहेत.

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये दि. ३०/११/२०२२ रोजी फिर्यादी गुलाब हिरा जाधव वय ३२ व्य.नौकरी ने पोस्टे कळमनुरी यांचे फिर्यादी वरून पोस्टे कळमनुरी येथे कलम 328,272,273 भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन यातील आरोपीने बेकायदेशीर रित्या गुटखा ज्यावर महाराष्ट्र राज्यात बंदी असतांना विक्री करण्याचे उददेशाने स्वताचे ताब्यात बाळगीत असतांना मिळुन आला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीकडुन एकुन ८,६७६ रू चा मुदेमाल जप्त करण्यात आला आहे व पुढील तपास कळमनुरी पोलीस करित आहेत.

**अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम :-**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैधरित्या शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द विशेष मोहिम अंतर्गत दि.३०/११/२०२२ रोजी कलम ३९९,४०२ भादवी सहकलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन यातील आरोपी हे मुददेमालासह दरोडा घालण्याचे पुर्व तयारीने एकत्रीत असतांना ०४ आरोपी मिळुन आले व ०२ आरोपी हे पळुन गेले आरोपीतां कडुन अवैध शस्त्र जप्त करण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास हिंगोली शहर पोलीस करित आहेत.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द दि.३०/११/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे सेनगाव अंर्तगत ०२ व पोस्टे बासंबा ०१ अशा एकुण ०३ ठिकाणी छापा टाकुन आरोपी विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ३०/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०२ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल व अपघात गुन्हे:—**

दिनांक ३०/११/२०२२ रोजी पोस्टे वसमत शहर येथे कलम २७९, ३०४(अ), ३३७, ३३८,४२७ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन ट्रक क्र एमएच २६ बिई ५०८५ चा चालकाने त्याच्या ताब्यातील ट्रक हा भरधाव वेगात हलगर्जी व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे भावाचे मोटार सायकलला पाठीमागुन धडक दिल्याने फिर्यादीचा भाउ गंभीर जखमी होवुन उपचार दरम्यान मरण पावला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत शहर पोलीस तपास करित आहेत

दिनांक ३०/११/२०२२ रोजी पोस्टे आ.बाळापुर येथे कलम २७९,३०४(अ),३३७,३३८ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन मोसा क्र एमएच ३८ टि २९८८ च्या चालकाने त्याचे ताब्यातील मोसा हि भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवुन तिचा अपघात करून फिर्यादीचे पत्नीचे डोक्यास गंभीर मार लागल्याने तिचे मरनास कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात बाळापुर पोलीस तपास करित आहेत